Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4 डॉ.भालचंद्र रू.देशमुख ISSN:-2230-7850

Research Papers

# ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थित्यंतरात स्वंयसहायता समुहाचे योगदान

**डॉ.भालचंद्र रू.देशमुख**
सहा.प्राध्यापक
जी.एन.आझाद समाजकार्य महाविद्यालय
पुसद जि.यवतमाळ

**प्रस्तावना :—**

सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतात महिलांचे प्रमाण पुरूषांच्या जवळपास बरोबरीचे आहे व देशाच्या आर्थिक विकासात सुध्दा त्यांची भुमिका अत्यंत महत्वपुर्ण आहे. असे असले तरी परंपरागत व्यवस्थेने महिलांना नाकारलेल्या अधिकारातून त्यांची स्थिती अतिशय दयनिय आहे. नॅशनल कमीशन फॉर वुमेन च्या अहवालनुसार, महिला पुरूषांच्या तुलनेत अधिक काम करतात. परंतू त्यांचे काम हे घरगुती असल्यामुळे त्यांचे आर्थिक मोल केल्या जात नाही. व त्या जिथे अर्थार्जन करतात ते क्षेत्र सुध्दा अधिक प्रमाणात असंगठीत असून तिथे त्यांना फारसा चांगला मजुरी दर दिल्या जात नाही. एकूण काम करित असलेल्या महिलांमध्ये 85 टक्के महिला हया असंघटीत क्षेत्रात काम करीत असून त्यांना रोजगारासाठी कृषीक्षेत्रावर निर्भर रहावे लागते, जिथे इच्छा व गरज असून सुध्दा वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. त्यातूनच भारतातील दारीद्रयात, प्रयत्न करून सुध्दा शासनाला यश आले नाही. ही बाब पाहता बांगला देशच्या धरतीवर डॉ.मेहमुद युनिसने स्थापन केलेल्या बचत गटाचे मॉडेल भारताने स्विकारून भारतीय महिलांना आर्थिक सक्षमतेकडे नेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

### ग्रामीण महिलांची स्थिती व रोजगार क्षेत्र

भारताच्या लोकसंख्येत स्त्रियांचे जितके प्रमाण आहे, त्या तुलनेत विकासातील त्यांचा सहभाग बराच कमी आहे. ग्रामीण भागाला तर हे विशेत्वाने लागू होते. 74 कोटी ग्रामीण लोकसंख्येत 49 टक्के स्त्रिया आहेत (कविमंडन 2006:108) यापैकी जवळपास 85 टक्के महिला अर्थार्जन कार्यात सहभागी आहेत. यामध्ये 2001 च्या जनगननेनुसार 36.5 टक्के स्त्रिया शेती करित असून शेतमजुरी व इतर कामे करणाऱ्या महिलांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 43.4 व 20.1 होते (एनआयआरडी 2004). तर केवळ एकूण संपत्तीच्या 1/3 वाटा तिच्या नावे आहे. निरक्षरता, सामाजिक अवहेलना, आरोग्याचे प्रश्न, राजकिय कुचंबना हया प्रमुख समस्यांमुळे ग्रामीण महिलांचे जीवन निम्न दर्जाचे असून रोजगारासाठी कृषीक्षेत्रावरच निर्भर रहावे लागत असल्यामुळे व कृषीक्षेत्र सिंचन सुविधांच्या अभावामुळे वर्षातून चार ते पाच महिण्यांपेक्षा अधिक दिवस रोजगार देवू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण महिलांच्या कार्यशक्तीचा पुरेपुर वापर केल्या जात नाही परिणामतः त्यांचे जिवनमान अतिशय खालावलेले आहे.

### ▪ स्वयं सहाय्यता समुहाची वाटचाल

ग्रामीण भागातील महिलांची सामाजिक आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी महिलांना एकत्र करून भारतात नाबार्डच्या प्रयत्नातून 2.2 मिलीयन स्वयं सहाय्यता समुह स्थापन केल्या गेले असून त्यामध्ये 33 मिलीयन महिला सहभागी आहेत (विकीपीडीया 2011). भारतात स्वयं सहाय्यता समुह स्थापन करण्यात अनुक्रमे आंध्रप्रदेश, तामिलनाडू, कर्नाटक ही राज्ये अग्रसर असून महाराष्ट्राचा सहावा कमांक लागतो. सध्या राज्यात शासकीय अशासकीय संस्थाचे मिळून एकूण 2 लाख 55 हजार 625 स्वयं सहायता समुह असून त्यातील 80 हजार 642 बचत गटांनी स्वतःचे उत्पादन सुरू केले आहे. ज्यामध्ये 71 हजार 713 बचत गट महिलांचे आहेत ( लोकमत 2011:3). महाराष्ट्रात स्वयं सहाय्यता समुह स्थापन करण्यात अनेक संस्थाचा सहभाग असला तरी मात्र महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) यामध्ये आघाडी घेवून शासकीय योजनांचा लाभ ग्रामीण स्तरावर पोहचविण्यासाठी सातत्यपुर्ण प्रयत्न कलेले आहेत.

माविमने फेब्रुवारी 2010 पर्यंत 332 तालुक्यांमधील एकूण 13000 गावांमध्ये आपले जाळे विनले असून 55,243 स्वयं सहाय्यता समुहाची स्थापना केलेली आहे. ज्यामध्ये 6 लाख 29 हजार महिलांचा सहभाग आहे. या स्वयं सहाय्यता समुहाची एकूण बचत रू 120.04 कोटी असून, अंतर्गत कर्जाची रक्कम रू. 348.12 कोटी व विवीध बँकांनी रू.251.87 कोटी कर्जाचे मदत या समुहांना केलेले आहे.

प्रस्तूत शोधनिबंधातून ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासात स्वयंसहायता समुहांनी कशाप्रकारे योगदान दिले आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. यासाठी प्राथमिक तथ्याचा आधार घेण्यात आला आहे.

### ▪ शोधनिबंधाचे उददेश

1) स्वयंसहायता समुहातील महिलांची व्यक्तीगत माहिती अभ्यासने.
2) स्वयंसहायता समुहात सहभागी झाल्यानंतर त्यांच्या आर्थिक

Please cite this Article as: डॉ.भालचंद्र रू.देशमुख ,ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थित्यंतरात स्वंयसहायता समुहाचे योगदान : Indian Streams Research Journal (March ; 2012)

स्थितीत झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास

▪ ***अध्ययन पध्दती***

प्रस्तूत शोधनिबंधासाठी गैरसंभाव्यता नुमना निवड पध्दतीचा उपयोग करून त्याअंतर्गत कोटा नमुना वापरून पसुद तालुक्यातील स्वयंसहायता समुहात सहभागी असलेल्या एकूण 100 महिलांची निवड करण्यात आली. 100 महिलांची निवड करतांना 50 स्वयंसेवी समुह व त्यामधील प्रत्येकी दोन सभासद स्नोबॉल नमुन्याअंतर्गत निवडल्या गेले. 50 गटांचा कोटा पुर्ण करण्यासाठी पुसद तालुक्यातील एकूण 15 गावांचा उपयोग करण्यात आला. प्राथमिक तथ्य संकलीत करण्यासाठी संरचीत मुलाखत अनुसुचीचा उपयोगात आनल्या गेली.

▪ ***अध्ययन क्षेत्र–एक दृष्टिकोप***

महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हयात पुसद तालुक्याचा समावेश होतो. पुसद तालुक्यात एकूण 120 गावांचा समावेश आहे.

▪ ***बचतगटात सहभागी महिलांची व्यक्तीगत माहिती***

बचतगटात सहभागी महिलांची व्यक्तीगत माहिती अभ्यासली असता, सारणी 1 नुसार असे स्पष्ट होते की, बहुंताश महिला 31 वर्शावरील असून, 18 ते 30 वयोगटातील 13 टक्के, 31 ते 43 वयोगटातील 70 टक्के व 44 ते 55 या वयोगटातील 17 टक्के महिला बचतगटात सहभागी आहेत. यामध्ये विशेष बाब अशी दिसून येते की, 18 वर्षाखालील व 55 वर्षावरील एकही महिला बचतगटात सहभागी नव्हती. बचतगटातील सर्वच महिला विवाहित असून बचत गटाच्या संदर्भात सर्वसाधारण नियम आहे की, सभासद महिला हया विवाहित असाव्यात व बहुदा त्या 18 वर्षावरील असाव्यात( कुलकर्णी 2000:64) यासदर्भात सर्वच बचतगटांनी या नियमांचे पालन केल्याचे दिसून येते. या महिलांची शैक्षणिक स्थिती असे दर्शविते की, 55 टक्के महिला हया निरक्षर असून 37 टक्के प्राथमिक शिक्षण घेतलेल्या तर माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या आठ महिला होत्या. सारणी 2 नुसार वयोगटानुसार महिलांचे शिक्षण असे दर्शविते की, निरक्षर महिलांचे प्रमाण (82.35 टक्के) हे 44 ते 55 या वयोगटात सर्वाधिक प्रमाणात होते. तर 18 ते 30 वयोगटातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण सर्वाधिक असून यागटामध्ये प्राथमिक तथा माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण अनुक्रमे 46.15 व 38.46 टक्के होते. जातीय वयोगटाच्या आधारे 73 टक्के महिला हया मागास जातीतील असून एससी जातीय वर्गवारीतील 29 टक्के महिला बचत गटात सहभागी होत्या. त्यापाठोपाठ व्हिजे 27 टक्के, एसटी 17, ओबीसी 16 टक्के व सर्वात कमी ओपन वर्गवारीतील महिला सहभागी होत्या त्यांचे शेकडा प्रमाण 11 होते.

महिलांच्या कुटुंबाचा व्यवसाय असे दर्शविते की, 57 टक्के महिलांच्या कुटुंबात केवळ मजुरी केल्या जात असून 31 टक्के महिलांकडे शेती होती. तर 12 महिलांकडे किराणा दुकाण होते. याआधारे त्यांच्या वार्षीक उत्पन्नाचा वेध घेतला असता 10 ते 15 हजार वार्षीक उत्पन्न असनाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक म्हणजे 73 टक्के होती तर 20 टक्के महिलांचे उत्पन्न 16 ते 25 हजार होते व 7 टक्के महिलांचे उत्पन्न 26 ते 35 हजार होते.

बचतीचे रक्कम असे दर्शविते की, रू.40 प्रति महिना बचतीचे रक्कम असणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक (56टक्के) होती. तर 24 टक्के महिला रू.50 प्रमाणे बचत करत होत्या. रू.60 प्रमाणे बचतीचे प्रमाण 20 टक्के महिलांचे होते. अध्ययनाअंतर्गत बचत गट स्थापन होण्याचा कालावधी असे दर्शविते की, अधिकांश बचत गट तीन वर्षापेक्षा अधिक काळापासून स्थापन झालेले आहेत. यामध्ये 19 टक्के 3 वर्ष, 78 टक्के 4 वर्श 3 टक्के बचत गटांना स्थापन होवून 4 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला होता.

▪ ***आर्थिक स्थितीत झालेले परिवर्तन***

अध्ययनांतर्गत घेतलेल्या सर्वच बचत गटांना स्थापन होवून जवळपास 3 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला होता. त्याआधारे महिलांच्या आर्थिक परिस्थितीत कशा प्रकारचे परिवर्तन झालेले आहे हे अभ्यासले असता सर्वच बचत गटांना बँकेद्वारे कर्ज उपलब्ध झाले होते. ग्रामीण भाग रोजगाराच्या संदर्भात अद्यापही तहानलेलाच आहे. महिलांची इच्छा असून सुध्दा त्यांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे बरेचदा अचानक उदभावलेल्या प्रसंगासाठी सावकारी कर्ज घ्यावे लागते ज्याचा व्याजदर हा जास्त असतो. त्यामुळे ही कुटुंबे वर्षानुवर्षे व्याजाच्याच चक्रात अडकुन पडतात. बचतगट हा अशा प्रकारच्या कर्जासाठी एक उत्तम पर्याय म्हणून पुढे आला असून घरखर्च, भौतीक सुविधा, गृहोद्योग, पशुपालन यासारख्या अनेक गोष्टींसाठी बचत गटाच्या माध्यमातून हातभार लागनू कुटुंबांची आर्थिक स्थिती उंचावत आहे.

बचतगटाच्या माध्यमातून मुलांच्या शिक्षणासाठी सहज पैसा उपलब्ध झाला, याविधानाशी 38 टक्के महिला सहमत असून 36 टक्के महिलांच्या मते कुटुंबातील भौतीक साधनांची खरेदी करणे शक्य झाले. सर्वात मोठा बदल दैनंदिन आहारामध्ये दिसून येतो 60 टक्के महिलांच्या मते बचत गटात सहभागी झाल्यापासून रोजगाराच्या संदर्भात जो आत्मविश्वास निर्माण झाला त्यातून आहाराच्या दर्जाबाबत सुधारणा झाली. यामध्ये विशेषतः बचत गटाच्या माध्यमातून अंगणवाडी शाळेमध्ये जी खिचडी बनविल्या जाते त्यामध्ये बचतगटाच्या महिलांना प्राधान्य दिल्या गेले. त्यातून महिलांना रोजगार प्राप्त झाला. यामाध्यमातून रोजगार मिळविणाऱ्या 29 टक्के महिला होत्या. तर बँकेद्वारे मिळालेल्या कर्जातून 33 टक्के महिलांनी शेळी, म्हैस, गाय अशा प्रकारचे पशुधन खरेदी केले होते. त्यामुळे यामाध्यमातून सुध्दा या महिलांना आर्थिक उत्पनाचे स्त्रोत निर्माण झाले.

70 टक्के महिलांच्या मते बचत गटाच्यामाध्यमातून आरोग्यविषयक समस्यांना सोडविने शक्य झाले तर 55 टक्के महिलांच्या मते कुटंबात कपडयांची खरेदी वाढली. पुर्वी मुलांसाठी एकतर शाळेचा गणवेश व एखादवेळ सन उत्सावाला कपडे, याव्यतीरिक्त कपडयांची खरेदी केल्या जात नव्हती, असे 80 टक्के महिला मत व्यक्त करतात. जिथे आता कपडयांच्या खरेदीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. भौतीक साधनांच्या बाबतीत सुध्दा वाढ झाल्याचे आढळून आले. अनेक महिलांनी टिव्ही, डिश, कुकर, गृहोपयोगी भांडे, मुलांसाठी सायकल, फॅन अशा वस्तुंची खरेदी केली. ही संख्या जरी कमी असली तरी मात्र हे परिवर्तन बचतगटातूनच झाल्याचे महिला मान्य करतात. ज्यातून ग्रामीण भागातील जवळपास 85 टक्के महिला अर्थार्जन कार्यात सहभागी असतात. असे असतांनाही त्यांना मिळालेल्या पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य अथवा कुटुंबातील अन्य निर्णयाच्या संदर्भात नेहमीच बाजुला सारल्या जाते. बचतगटाच्या माध्यमातून जे विविध उपक्रम राबविल्या जातात त्यातुन स्त्री–पुरूश समानतेसंदर्भात दृष्टिकोण विकसीत व्हायला सुरूवात झाली. त्याचा प्रभाव कुटंबात आर्थिक बाबतीत जे निर्णय घेतल्या जातात, त्यामध्ये स्त्रियांना सहभागी करून घ्यायला सुरूवात झाल्याचे सारणी क्र. 4 मधुन दिसून येते. बचतगटाच्या माध्यमातून जी आर्थिक प्रक्रिया घडून येत आहे, त्यातून घरखर्चाचे स्वातंत्र्य बचतगटाच्या सहभागानंतर मिळाल्याचे 92 टक्के मान्य करतात. तर वस्तुंच्या खरेदीतील निर्णयातील सहभाग वाढल्याचे 96 टक्के महिलांना वाटते. 7 टक्के महिलांच्या मते कुटुंबाच्या ध्येयधोरणातील सहभाग हा पुर्विपासून होत. तर 93 टक्के महिलांचा हा सहभाग बचतगटात सहभागी झाल्यानंतर वाढला. बाजार प्रकियेतील निर्णय बचतगटापुर्वी 25 टक्के महिलांना होता, जो 75 टक्के महिलांना बचतगटातील सहभागानंतर मिळाला. तर वैयक्तीक खर्चाचे स्वातंत्र्य बचत गटात सहभागी झाल्यानंतर मिळाल्याचे 98 टक्के महिलांना वाटते.

***निष्कर्श***

भारतात महिलांना अर्धांगीनी म्हणून संबोधल्या जाते. असे असले तरी मात्र त्यांना प्रत्यक्षात मात्र तो वाटा कधीच मिळाला नाही.

*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4*

परिणामतः पुरूषांच्याच संख्येने असलेल्या महिलांचा आर्थिक विकास झाला नाही, ज्याचा प्रभाव कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर झाला. शासनाने अनेक योजना राबवील्या त्यानंतर सुध्दा ग्रामीन दारीद्रयाचे प्रमाण कमी करता आले नाही. त्याचे कारण सुध्दा महिलांना बाजुला सारून आखल्या गेलेले धोरणच होय. हे ओळखुन बांगला देशच्या धरतीवर भारतात सुध्दा बचतगट स्थापन करायला प्रारंभ झाला, त्यामाध्यमातुन महिलांचा आर्थिक प्रक्रियेतील सहभाग वाढला. रोजगाराच्या संदर्भातील भटकंती काही अंशी कमी झाली व त्यातून निर्माण झालेल्या आत्मविश्वासातून कुटुंबातील आर्थिक विकास घडुन आला. निश्चितच आर्थिक स्थितीत झालेल्या परिवर्तनाचे आकडे हे लहान आहेत. परंतू ती सुध्दा बचतगटाच्या माध्यमातून शक्य झाली आहेत हे मान्य केले तर निश्चीतच ग्रामीण भागातील महिलांना बचतगटाच्या माध्यमातून एक नवी दिशा प्राप्त होवून खऱ्या अर्थाने स्त्रि–पुरूष समानता प्रस्थापीत व्हायला फारसा वेळ लागणार नाही, ज्यातून उदयाच्या बलशाली भारताची घडण होईल.

### *संदर्भ*

कुलकर्णी विजय. 2000.''बचतनामा''.पुणे. चैतन्य प्रकाशन. पृ.64
कविमंडन विजय. 2006. ''ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृश्टिकोन''. नागपूर.श्री मंगेश प्रकाशन.पृ.108
........रूरल डेव्हलपमेंट स्टॅटीस्टीक.2004.नॅशनल इस्टिटयुट ऑफ रूरल डेव्हलपमेंट, हैद्राबाद, मिनिस्ट्री ऑफ रूरल डेव्हलपमेंट पृ.109
.......''तज्ञ बाजारसंस्थांचे बचत गटांना मार्गदर्शन मिळणार''. 2011.लोकमत. दि.27 ऑगस्ट.पृ.3
विकीपीडीया दि.23.8.2011

सारणी 1
महिलांची व्यक्तीगत माहिती

| अक | व्यक्तीगत माहिती | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महिलांचा वयोगट | 18 ते 30 वर्ष | 13 | 13.00 |
| | | 31 ते 43 वर्ष | 70 | 70.00 |
| | | 44 ते 55 वर्ष | 17 | 17.00 |
| 2 | शिक्षण | निरक्षर | 55 | 55.00 |
| | | प्राथमिक | 37 | 37.00 |
| | | माध्यमिक | 08 | 08.00 |
| 3 | जातीय वर्गवारी | ओपन | 11 | 11.00 |
| | | ओबीसी | 16 | 16.00 |
| | | एससी | 29 | 29.00 |
| | | एसटी | 17 | 17.00 |
| | | व्हीजे | 27 | 27.00 |
| 4 | कुटुंबातील सदस्य संख्या | 4 पेक्षा कमी | 13 | 13.00 |
| | | 5 ते 7 | 69 | 69.00 |
| | | 8 ते 10 | 18 | 18.00 |
| 5 | कुटुंबाचा व्यवसाय | शेती | 31 | 31.00 |
| | | मजुरी | 57 | 57.00 |
| | | व्यवसाय | 12 | 12.00 |
| 6 | वार्षिक उत्पन्न | रू.10 ते 15 हजार | 73 | 73.00 |
| | | रू.16ते 25 हजार | 20 | 20.00 |
| | | रू.26 ते 35 हजार | 07 | 07.00 |
| 7 | बचतगटातील बचतीची रक्कम | रू. 40 | 56 | 56.00 |
| | | रू. 50 | 24 | 24.00 |
| | | रू. 60 | 20 | 20.00 |
| | एकूण | | 100 | 100 |

स्त्रोतः फिल्ड डाटा

सारणी 2

वयोगटानुसार महिलांची शैक्षणिक स्थिती

| वयोगट | शिक्षण | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | |
| 18 ते 30 वर्ष | 02(15.38)* | 06(46.15) | 05(38.46) | 13(100) |
| 31 ते 43 वर्ष | 39(55.71) | 29(41.42) | 02(02.85) | 70(100) |
| 44 ते 55 वर्ष | 14(82.35) | 02(11.76) | 01(05.88) | 17(100) |
| एकूण | 55(55.00) | 37(37.00) | 08(08.00) | 100(100) |

(*कंसातील आकडेवारी शेकडेवारी दर्शविते)

सारणी 3

आर्थिक स्थिती उंचावण्यातून झालेला परिणाम

| परिणाम | सहमत | अल्पसहमत | असहमत | एकूण |
|---|---|---|---|---|
| मुलांच्या शिक्षणासाठी सहज पैसा उपलब्ध झाला | 38 (38.00)* | 13 (13.00) | 49 (49.00) | 100(100) |
| कुटुंबातील भौतीक साधनाची खरेदी करणे शक्य झाले | 36 (36.00) | 04 (4.00) | 60 (60.00) | 100(100) |
| दैनंदिन आहाराचा दर्जा सुधारला | 60 (60.00) | 15 (15.00) | 25 (25.00) | 100(100) |
| आरोग्यविषयक समस्यांना सोडविने शक्य झाले | 70.00 (70.00) | 06 (06.00) | 24 (24.00) | 100(100) |
| कपडयांची खरेदी वाढली | 55 (55.00) | 09 (09.00) | 36 (36.00) | 100(100) |

स्त्रोतः फिल्ड डाटा (*कंसातील आकडेवारी शेकडेवारी दर्शविते)

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4

सारणी 4

बचत गटातील आर्थिक प्रक्रीयेचा कुटुंबातील निर्णय प्रक्रियवर प्रभाव

| अक्र | कुटुंबातील निर्णय प्रक्रियेतील बदल | बचतगटातील सहभागापुर्वीपासून | सहभागानंतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | घरखर्चाचे स्वातंत्र्य | 08(08.00)* | 92(92.00) | 100(100) |
| 2 | वस्तुंच्या खरेदीतील निर्णयातील सहभाग | 04(04.00) | 96(96.00) | 42(100) |
| 3 | कुटुंबाच्या ध्येयधोरणातील सहभाग | 07(07.00) | 93(93.00) | 42(100) |
| 4 | बाजारप्रक्रियेतील निर्णय | 25(25.00) | 75(75.00) | 42(100) |
| 5 | वैयक्तीक खर्चाचे स्वातंत्र्य | 02(02.00) | 98(98.00) | 42(100) |

स्त्रोत : फिल्ड डाटा (*कंसातील आकडेवारी शेकडेवारी दर्शविते)